# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
" उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र,
अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०० ०९३
दुरध्वनी क्रमांक - ०२२ - ४७४८४६७९/४७४८४६९९/४७४८८३१२
ईमेल : gmhrrecruitment@midcindia.org


---

जा.क्र.मऔविम/साप्रवि/स.से.भ./P262563 /२०२४ दिनांक : 25 JUN 2024

## सरळसेवा भरती - २०२३ सुचनापत्र

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सरळसेवा भरती - २०२३ अंतर्गत ३४ संवर्गातील ८०२ पदांसाठी दि.१४/०८/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६, दि. २६/०२/२०२४ अन्वये राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ मधील तरतुदी, दि. २६/०२/२०२४ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग असा नवीन वर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे आणि या वर्गासाठी राज्यांच्या अखत्यारीतील लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीमध्ये दहा टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. याबाबतच्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र. ७५/१६-क दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ मधील तरतूदीनुसार सरळसेवेने भरण्यात येणारी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाची (SEBC) आरक्षणाची १० % पदे दिनांक २६/०२/२०२४ पासून भरणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने, सरळसेवा भरती - २०२३ अंतर्गत ३४ संवर्गाची बिंदुनामावली अद्ययावत करण्याचे काम सुरु आहे. त्यानुसार जाहिरातीमधील संवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. नवीन सुधारीत बिंदुनामावलीप्रमाणे प्रवर्गनिहाय रिक्त पदांची माहिती व परीक्षा घेणेबाबत सुचनापत्र महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत सर्व अर्जदार / उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत
(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ